ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख २० डिसेंबर, १९६१ | अंक ११

## विविध माहिती

**कोचीन बंदरांत गुदाम**—कोचीन बंदरांत स्वतःच्या मालकीचें नवें गुदाम बांधण्याचें सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशननें ठरविलें आहे. ह्या गुदामांत ३,००० टन माल सांठविण्याची सोय करण्यांत येणार आहे व तें बांधण्यासाठी ६ लाख रुपये खर्च येणार आहे. गुदामासाठी लागणारी जागा ताब्यांत घेण्यांत आली आहे. केरळ राज्यांत कॉर्पोरेशनचीं ५ गुदामें आहेत. सुरवातीला गुदामाच्या इमारती भाड्यानें घेण्यांत आल्या होत्या.

**पोरबंदर येथें सिमेंटचा कारखाना**—पोरबंदर येथें सिमेंटचा नवा कारखाना काढण्यांत येणार असून तेथील आणखी दोन कारखान्यांचा विस्तार करण्यांत येणार आहे. नव्या कारखान्याचें व कारखान्यांच्या विस्ताराचें काम १९६३ अखेर पूर्ण होईल. काम पूर्ण झाल्यावर सिमेंटच्या उत्पादनांत दरसाल ८ लाख टनांची भर पडेल. जुन्या कारखान्यांपैकी एक गेल्या ऑक्टोबर-मध्यें चालू झाला आहे.

**स्टॅलिनच्या गुन्ह्यासंबंधीं पुस्तक**—सुप्रसिद्ध रशिअन कादंबरीकार मि. एरेनबर्ग हे स्टॅलिननें आपल्या कारकीर्दींत केलेल्या रक्तरंजित गुन्ह्यासंबंधीं पुस्तक लिहिणार आहेत. स्टॅलिन-च्या अपकृत्यांचें वर्णन गुन्हा म्हणून करणारे ते पहिलेच रशिअन ग्रंथकार आहेत. १९३७ ते १९४९ पर्यंत स्टॅलिनने कम्युनिस्ट पक्षांतील कार्यकर्त्यांविरुद्ध केलेल्या अपकृत्यांची माहिती पुस्तकांत येईल.

**बेळगांवचा पाणीपुरवठा**—बेळगांवच्या पाणीपुरवठ्याची नवी योजना आतां पूर्ण झाली असल्यानें बेळगांवच्या १॥ लाख लोकवस्तीला लवकरच नळाचें पाणी लाभेल. शहराच्या दक्षिणेस पाणीपुरवठ्याचें टाकें बांधण्यांत आलें आहे. प्रथम १,००० गॅलन पाण्याला १·२५ रुपये आकार घेण्यांत येणार आहे. पाणी घेणारांची संख्या वाढल्यावर आकार कमी करण्यांत येईल.

**मध्यप्रदेशांतील कापडधंदा**—मध्यप्रदेशांतील खाजगी मालकीच्या कापडाच्या गिरण्यांतून १·५ लाख नव्या चात्या बसविण्याची परवानगी देण्यांत आली आहे. भारत सरकारनें मध्य-प्रदेशासाठी मंजूर केलेल्या सर्व चात्या आता संपल्या आहेत. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन मध्यप्रदेशांत सुमारें १२ कापडाच्या गिरण्या नव्यानें काढण्यांत येण्याची शक्यता आहे. मध्यप्रदेशांतील सातहि कारभार-विभागांतून एक तरी नवी गिरणी निघेल.

**परदेशीय कर्जाचा उपयोग**—प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. अशोक मेहता कोइमतूर येथें बोलतांना म्हणाले कीं भारताच्या औद्योगिक विकासासाठी कांहीं विवक्षित उद्योग-धंद्यांत परदेशीय कर्जाचा उपयोग करणें अपरिहार्य आहे. ह्या कर्जाचा उपयोग जोंपर्यंत योग्य रीतीनें करण्यांत येत आहे तोंपर्यंत तीं परत तर देतां येतीलच; पण नंतर भारत स्वयंपूर्णहि होईल.

**सायबेरिआंतील जलविद्युत केंद्र**—रशिआनें सायबेरिआंत एक प्रचंड जलविद्युत केंद्र बांधलें आहे. हें केंद्र जगांतील सर्वांत मोठें आहे असें म्हणतात. केंद्रांत तयार होणारी वीज कारखान्यां-साठी वापरण्यांत येणार आहे. तें बांधण्याचें काम ६ वर्षें चालू होतें. वीज केंद्रांतील सर्व जनरेटर्स चालू झाले म्हणजे दरसाल २,२०० कोटी किलोवॅट वीज पुरवितां येईल असा अंदाज आहे.

**शिक्षणाचें माध्यम, हिंदी**—पाटणा विद्यापीठाच्या सिनेटनें विद्यापीठांतील शिक्षणाचें माध्यम म्हणून हिंदीला मान्यता दिली आहे. १९६२ पासून विद्यापीठातर्फे चालविल्या जाणाऱ्या अभ्यास-क्रमांची परीक्षा हिंदींतून घेतली जाईल. पदवीनंतरच्या परीक्षांचा मात्र अपवाद करण्यांत आला आहे. तथापि, १९६५ पर्यंत विद्या-र्थ्यांना इंग्रजींतून उत्तरपत्रिका लिहिण्याची सवलत देण्यांत आली आहे.

**जपानचा बदलता चेहरा**—अलीकडे भारतांतून जपानला जाणाऱ्या उद्योगधंदेवाल्यांच्या व हौशी प्रवाशांच्या संख्येंत बरीच वाढ झालेली आहे. त्यांच्या दृष्टीस पडलेला जपान परंपरागत जपानपेक्षा अगदींच वेगळा आहे. नाजूक नृत्यांगना अगर त्या वापरींत असलेला किमोनो आता क्वचितच दिसतो. जपान आतां एक पुढारलेला उद्योगप्रधान देश झालेला आहे. पाश्चिमात्य देशां-बरोबर तो यशस्वी रीतीनें औद्योगिक स्पर्धा करीत आहे.

**खताचे नवीन कारखाने**—खाजगी मालकीच्या विभागांत विशाखापट्टम् आणि कोथागुडेम ह्या ठिकाणीं खताचे दोन प्रचंड कारखाने काढण्यांत येणार आहेत. प्रत्येक कारखान्यासाठी २५ कोटी रुपये भांडवल लागेल. दोन्ही कारखाने १९६३ अखेरीस खताच्या उत्पादनास प्रारंभ करतील. त्याशिवाय खताचे आणखी दोन छोटे कारखाने काढण्याची परवानगीहि मध्यवर्ती सरकारनें दिली आहे.

**राडार बनविण्याची योजना**—भारत सरकारच्या संरक्षण खात्यानें भारत इलेक्ट्रॉनिक्स लि० ह्या कंपनीकडे राडार यंत्रें बनविण्याचें काम सोंपविलें आहे. संरक्षणासाठी अत्यावश्यक असलेलें हें यांत्रिक साधन बनविण्यासाठी भारत सरकारनें स्वित्झरलंडमधील एका कंपनीचें तांत्रिक साह्य घेतलें आहे. भारत इलेक्ट्रॉनिक्स कंपनीला १९६०–६१ सालीं ११·८५ लाख रुपये नफा झाला.

टेलिफोन नं. २७८३.

# पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या.........**

**आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.**

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवींवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षें | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | २॥ टक्के |

या शिवाय शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

# दि महाराष्ट्र स्टेट
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४-७५

पोस्ट बॉक्स नं. ४७२
-तारेचा पत्ता-कामर्सबँक

मुख्य कचेरी- ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. ७२ ,, |
| ठेवी | रु. १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. २७ कोटी |

**महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका २०४**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९१९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर

१ वर्ष ३¾% ३ वर्षें ४¼%
२ वर्षें ४% ४ वर्षें ४½%
५ वर्षें ५%

**हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.**

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, अॅड्व्होकेट, चेअरमन.

के. डी. शिराळकर, मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

**बँक लौकरच स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.**

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज-वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष

न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी

श्री. बा. ग. धंदुके

# अर्थ



बुधवार, ता. २० डिसेंबर, १९६१

संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी चळवळीचें वाढतें परावलंबन

सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी लागणाऱ्या द्रव्यसाह्याबाबत नियोजन समिति आणि रिझर्व्ह बँक ह्यांचा दृष्टिकोण एकच आहे कीं नाहीं, अशी शंका उत्पन्न झाली आहे. द्रव्यसाह्याचा प्रश्न हा महत्त्वाचा आहेच आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत, सहकारी चळवळीला पहिल्या व दुसऱ्या कार्यक्रमांत रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या द्रव्यसाह्याची चर्चा करण्यांत आली असून नंतर असें म्हटलें आहे कीं, भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढत्या गरजा आणि शेतीचीं उद्दिष्टें लक्षांत घेतां रिझर्व्ह बँकेला आपल्या साह्याचें प्रमाण अधिकच वाढवावें लागेल असें दिसत आहे. ह्याउलट, रिझर्व बँकेच्या रूरल इकॉनॉमिक डिव्हिजननें काढलेल्या ताज्या अभ्यासपत्रिकेंत जराशी वेगळी विचारसरणी मांडण्यांत आली आहे. ती अशी : तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सहकारी चळवळीचा जो विकास करण्याचें ठरलें आहे, त्याला अनुसरून सहकारांत पतीच्या कर्जाची मागणी खूप वाढणार आहे. त्यामुळें स्टेट व सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकांना आपले कर्ज देण्याचे व्यवहार वाढवावे लागणार आहेत. म्हणून ह्या बँकांनीं आपल्याजवळील ठेवी वाढविणें अगत्याचें झालें आहे.

सहकारी चळवळ सरकारकडून आणि रिझर्व्ह बँकेकडून मिळणाऱ्या द्रव्यसाह्यावर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. ठेवी आणि खेळतें भांडवल ह्यांच्या प्रमाणावरून ही गोष्ट उघड होते. १९५१–५२ सालीं स्टेट–कोऑपरेटिव्ह बँकांतील ठेवींचें त्यांच्या एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ५८ टक्के होतें. हें प्रमाण १९५९–६० सालीं ३४ टक्के झालें. ह्याउलट, बँकांनीं घेतलेल्या कर्जाचें प्रमाण मात्र ३१ टक्क्यांवरून ५४ टक्क्यांपर्यंत वाढलें. त्याचप्रमाणें, सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकांतील ठेवींचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ६४ टक्क्यांवरून ३९ टक्क्यांवर आलें आणि घेतलेल्या कर्जाचें प्रमाण २० टक्क्यांवरून ४५ टक्क्यांपर्यंत वाढलें. स्टेट व सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकांनीं घेतलेल्या कर्जांपैकी ९० टक्के कर्जे रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलीं होतीं. सहकारी चळवळ द्रव्यसाह्यासाठीं रिझर्व्ह बँकेवर अधिकाधिक प्रमाणांत अवलंबून आहे ह्यांत आश्चर्य नाहीं. कारण, धोरणच तसें आहे. काळजी वाटण्यासारखी बाब दुसरीच आहे. रिझर्व्ह बँकेच्या अभ्यासपत्रिकेंत दाखवून दिल्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडून सवलतीच्या व्याजाच्या दरानें द्रव्यसाहाय्य मिळत असल्यामुळें को-ऑपरेटिव्ह बँका स्थानिक लोकांकडून ठेवींच्या रूपानें द्रव्यसाह्य मिळविण्याचे करावे तितके प्रयत्न करीत नाहींत. ही प्रवृत्ति कोणालाच, विशेषत: नियोजन समितीला, इष्ट वाटण्यासारखी नाहीं. उलट, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत स्थानिक द्रव्यसाधनांना अधिक महत्त्व दिलें गेलें आहे. प्राथमिक सहकारी सोसायट्यांचें भाग भांडवल ४२ कोटी रु. वरून ८५ कोटींपर्यंत जावें, सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकांचें भांडवल २२ कोटींवरून ६२ कोटींवर जावें आणि स्टेट कोऑपरेटिव्ह बँकांचें भांडवल ९ कोटींवरून २३ कोटींवर जावें, अशी अपेक्षा आहे. १९५९–६० पासून १९६५–६६ पर्यंत सहकारी चळवळींतील सर्व पातळींवरील संघटनांच्या ठेवींतहि वाढ होईल अशी अपेक्षा करण्यांत आली आहे.

ह्या अपेक्षा पूर्ण झाल्या तरीसुद्धां सहकारी चळवळीला आपलीं कर्जे देण्याचें लक्ष्य गांठण्यासाठी मुख्यत: रिझर्व्ह बँकेवरच मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावें लागणार आहे. १९६५–६६ पर्यंत ५३० कोटींचीं अल्प व मध्यम मुदतीचीं कर्जे आणि १५० कोटींचीं दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्याचे लक्ष्य ठरविण्यांत आलें आहे. सहकारी चळवळीचें हें परावलंबित्व अपरिहार्य आहे. परंतु सहकारी संस्थांनीं स्वत:च्या बळावर स्थानिक द्रव्य गोळा करण्याचे फारसे प्रयत्न न करतां रिझर्व्ह बँकेवरच भिस्त ठेवली, तर मात्र तें योग्य होणार नाहीं.

---

## महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांपुढील प्रश्न

महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांच्या पुढें सध्या दोन महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. पहिला प्रश्न बाजारपेक्षा अधिक उत्पादनाचा व दुसरा उत्पादनाला येणाऱ्या वाढलेल्या खर्चाचा. ही परिस्थिति निर्माण होण्यास अनेक कारणें घडलीं आहेत. राज्यांतील साखर कारखान्यांनीं उत्पादनाचा उच्चांक गांठलेला आहे. १९६० मध्यें साखर कारखान्यांनीं ४,५५,३६७ टन साखरेचें उत्पादन केलें, तर चालू वर्षी ५,८७,७३५ टन साखरेचें उत्पादन केलें. ब्रिटनला निर्यात करण्यांत येणाऱ्या साखरेंत आपल्याला भरपूर वांटा मिळेल अशी आशा कारखान्यांना वाटत होती, आणि त्या अनुरोधानें त्यांनीं साखरेच्या उत्पादनवाढीकडे विशेष लक्ष दिलें. कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतून गेल्या मे महिन्यांत दक्षिण आफ्रिका फुटून निघाली. त्यामुळें कॉमनवेल्थ साखर करारांतील कलमांना अनुसरून राष्ट्रगटांतील इतर देशांना ब्रिटनला लागणाऱ्या साखरेपैकी ६० टक्के साखर पुरवावी लागेल असा अंदाज करण्यांत आला होता. ब्रिटन स्वत: आपणास लागणाऱ्या साखरेपैकी ३० टक्के साखर तयार करते व ६० टक्के कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांकडून आयात करते. ह्या आयातींत दक्षिण आफ्रिकेचा वांटा सर्वांत अधिक असे. पण दक्षिण आफ्रिका ब्रिटनला ज्या भावानें साखर पुरवीत असे त्या भावांत ती पुरविणें भारताला शक्य झालें नाहीं. म्हणून भारताला ब्रिटनमधील साखरेच्या बाजारपेठेंत उतरता आलें नाहीं. ब्रिटनमध्यें साखरेच्या एका किलोग्रॅमला सुमारें ८ पेन्स दावे लागतात. भारतामधील साखर ब्रिटनला निर्यात करावयाची झाली तर तिचा भाव एका किलोग्रॅमला सुमारें ११ पेन्स पडेल. अशा परिस्थितींत भारतामधील सर्वच कारखान्यांजवळ साखरेचे साठे बाजारपेठेअभावीं तुंबून राहूं लागले आहेत. त्यामुळें दर पोत्यामागें २ ते ३ रुपये कमी घेऊन त्यांना साखर खपवावी लागत आहे.

---

## स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या कामकाजांत वाढ

### निर्यातींत ५२% अशुद्ध खनिजें; १·४४ कोटी रु. नफा; १०% डिव्हिडंड

जुलै, १९५९ ते मार्च, १९६० या ९ महिन्यांच्या कालावधींत स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें केलेल्या उलाढालींत ४२ कोटी रुपयांवरून ६५ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली. निर्यातीचा आंकडा २३·२३ कोटी रुपयांवरून ३६·६ कोटी रुपयांवर गेला. कॉर्पोरेशननें या वर्षांत खाजगी व्यापार–उद्योगधंदे क्षेत्रास अत्यावश्यक असा भांडवली माल, कच्चा माल व इतर साहित्य यांच्या आयातीस व सुमारें २० कोटी रुपये किंमतीच्या तयार मालाच्या निर्यातीस कोठल्याहि प्रकारचे सर्व्हिस चार्जेस न घेतां साह्य केलें तर नाममात्र सर्व्हिस चार्जेस घेऊन या क्षेत्रास २६ कोटी रुपये किंमतीच्या मालाच्या उलाढालीस अप्रत्यक्ष रीत्या साह्य केलें.

या वर्षांत कॉर्पोरेशननें पश्चिम युरोपांतील अनेक देशांशीं उभयपक्षी मिळून सुमारें १५ कोटी रुपये किंमतीच्या मालाच्या व्यापारासाठी अनेक करार पक्के करण्यांत यश मिळविलें. भारत सरकारनें उभयपक्षीय असे व्यापारी करार केलेल्या देशांबरोबर व्यापारांत अधिक वाढ करण्यांतहि हें कॉर्पोरेशन यशस्वी झालें आहे. या देशांकडून आयात करण्याची व्यवस्था झालेल्या मालांत मशीन टूल्स, माती हालविण्यासाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री, छपाईचीं यंत्रें, डिझेल इंजिनें, पोलाद व मिश्र पोलाद, एक्स–रे फिल्म, इत्यादींचा समावेश होता. या वस्तूंच्या आयातीच्या बदल्यांत अशुद्ध लोखंड, अशुद्ध मँगेनीज, चहा, पादत्राणें, कातडीं व चामडीं, अभ्रक, तंबाकू, एक्सपोज्ड सिनेमाटोग्राफ फिल्म्स, वनस्पति तेलें, लोकरी माल, सुती कापड, हस्तव्यवसायांत तयार झालेल्या वस्तू, इत्यादींची निर्यात करण्याची व्यवस्था झाली.

### अशुद्ध लोखंडाच्या निर्यातींत वाढ

सदर कॉर्पोरेशननें केलेल्या निर्यातींत अशुद्ध खनिजें व खनिज पदार्थ यांच्या निर्यातीचें प्रमाण ५२ टक्के आहे; त्यामागील वर्षाचें हें प्रमाण ४४ टक्के होतें. या वर्षांत कॉर्पोरेशननें ३० लाख टन अशुद्ध लोखंडाची निर्यात केली. त्याचप्रमाणें हिंदुस्तान स्टील लि. च्या पोलाद कारखान्यासाठींहि १० लाख टन अशुद्ध लोखंडाचा पुरवठा केला. सध्यां कॉर्पोरेशन अधिक मालाची निर्यात करण्याच्या व दीर्घ मुदतीचे व्यापारी करार करण्याच्या प्रयत्नांवर भर देत आहे. तदनुसार कॉर्पोरेशनच्या शिष्टमंडळानें जपानमधील पोलादधंद्याशीं वाटाघाटी करून त्या देशास भारतांतून ६० लाख टन अशुद्ध लोखंडाचा पुरवठा करणारा तीन वर्षे मुदतीचा एक करारहि पक्का केला. या वर्षांत कनिष्ठ दर्जाच्या अशुद्ध लोखंडाची निर्यात त्यामागील वर्षांतील २·७ लाख टनांवरून ४·१ लाख टनांवर गेली.

### अशुद्ध मँगेनीज

अशुद्ध मँगेनीजच्या निर्यातींत, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील स्पर्धा तीव्र झाली असली तरीहि, निर्यातीची मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यासाठी कॉर्पोरेशननें अनेक उपाय योजले. वस्तुविनिमय करार ( बार्टर डील्स ), संयुक्त बाजारपेठ व्यवस्था व इतर उपाययोजनांद्वारें कॉर्पोरेशननें या वर्षांत खनिजांच्या निर्यातींत त्यामागील वर्षांतील ३·९४ लक्ष टनांवरून या वर्षांत ८·५२ लक्ष टनांपर्यंत वाढ केली. मँगेनीज व फेरो-मँगेनीजची मिळून या वर्षांत सुमारें १० लाख टन निर्यात झाली. हा आंकडा भारताच्या एकूण निर्यातीच्या ७० टक्क्यांहून अधिक व १९५९–६० च्या या खनिजांच्या निर्यातीच्या दुप्पट आहे असें अहवालांत म्हटलें आहे.

पादत्राणें, डाळी, तागाचीं पोतीं, मीठ, लाख, यांच्या निर्यातींत या वर्षांत वाढ झाली तर सायकली, विजेचे पंखे, फाउंटन पेनें, इमिटेशन पर्ल्स्, शिवण्याचीं यंत्रें, इलेक्ट्रिक इन्स्ट्रुमेंट्स्, स्टॅबलायझर्स, इत्यादि मालाची या वर्षापासून कॉर्पोरेशनमार्फत निर्यात होऊं लागली.

### आयात

आयातीच्या क्षेत्रांत कॉर्पोरेशननें कॉस्टिक सोडा, म्युरिएट ऑफ पोटॅश, कच्चें रेशीम, अलोहित धातु, रंगणासाठी वापरली जाणारी तेलें, कृत्रिम रेशमाचें सूत, इत्यादिसुद्धां अनेक वस्तूंच्या आयातीची सोय केली. देशी वापरदारांच्या सोयीसाठीं कच्च्या रेशमाच्या व म्युरिएट ऑफ पोटॅशच्या विक्रीच्या किंमती कमी करण्यांत आल्या.

### सिमेंट

कॉर्पोरेशननें गतवर्षी १·४१ लाख मेट्रिक टन सिमेंटची निर्यात करतांना २७·३३ लाख रु. ची नुकसानी सोसली होती. या वर्षी १·०६ लाख मेट्रिक टन सिमेंटची निर्यात झाल्यानें नुकसानीचा आंकडा १७ लाख रु.वर आला. १९५९–६० मध्यें सिमेंटच्या या एजन्सीमुळें कॉर्पोरेशनकडे १·४ कोटी रुपये शिलकींत होते परंतु या वर्षी सिमेंटच्या कारखान्यांच्या ठिकाणच्या वाढत्या किंमती, रेल्वे वाहतुकीचें व पॅकिंगचें वाढतें भाडें, इत्यादिमुळें कॉर्पोरेशनला १·२५ कोटी रुपयांची तूट आली.

या वर्षांत कॉर्पोरेशनला एकूण ४·९६ कोटी रुपये उत्पन्न झालें. यांतील खर्चवेच, घसारा आणि कर यासाठी बाजी लागलेली रक्कम वगळतां निव्वळ नफा १·४४ कोटी रुपये झाला व भाग भांडवलावर गतवर्षीच्या ९ टक्क्यांऐवजीं १० टक्के लाभ जाहीर करण्यांत आला.

---

### गुजरात राज्यांतील विश्रांतिस्थान

विरमगामजवळील नील सरोवराजवळ प्रवाशांसाठी एक विश्रांतिस्थान उभारण्याचें गुजरात सरकारनें ठरविलें आहे. ह्या सरोवराच्या आसपासचा भाग निसर्गसौंदर्यानें नटलेला असून तेथें डिसेंबरमध्यें आफ्रिका, सैबेरिआ, स्वित्झरलँड, इत्यादि देशांतून स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांचे थवे येत असतात. ह्या पक्ष्यांना मारण्याची बंदी करण्यांत येणार आहे. प्रवाशांच्या वास्तव्यासाठी दोन खोल्यांचे गाळे बांधण्यांत येणार आहेत. तेथून त्यांना पक्ष्यांच्या जीवनाचा चांगला अभ्यास करतां येईल.

---

### भारतामधील परदेशीयांची संख्या

१९६० च्या डिसेंबर अखेरीस भारतांत सुमारें ६०,००० परदेशीय नागरिक राहात होते. ह्या आंकड्यांत १६ वर्षांखालील मुलें, कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांचे अधिकारी, इत्यादि धरलेले नाहींत. परदेशीयांपैकी एकतृतीयांश लोक पश्चिम बंगालमध्यें, १५,५०० महाराष्ट्रांत, दिल्लींत ३,११०, बिहारमध्यें ३,२२३, हिमाचल प्रदेशांत २,३९६, मध्यप्रदेशांत २,४४४, आसाममध्यें १,९४२ व अंदमान बेटांत १,०३५ राहात होते. देशवार त्यांची संख्या अशी होती:–चिनी ११,३०७, तिबेटी १२,२३१, इराणी ५,०२९, अफगाण ५,४२९, अमेरिकन ३,७६६, जर्मन्स ३,२९२, रशिअन २,२९५, ब्रह्मी १,६७०, फ्रेंच १,०८६ व इटालिअन्स १,२०५.

---

## अल्पसंख्याक शेअरहोल्डरांवर जुलूम

### हायकोर्टानें गाऱ्हाणें ऐकून न्याय दिला

( ओरिसा हायकोर्टाचा निवाडा )

ओरिसा हायकोर्टाचे न्यायमूर्ति बर्मन ह्यांनीं श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांचा अर्ज मंजूर करून, कलिंग ट्यूब्स लि. च्या बहुसंख्य भागदारांनीं अल्पसंख्य भागदारांवर चालविलेल्या जुलुमास आळा घातला. श्री. जैन ह्यांनीं कंपनी कायद्याच्या ३९७, ३९८, ४०२ आणि ४०३ ह्या कलमांखालीं अर्ज करून दाद मागितली होती. प्रतिवादींमध्यें कंपनी, श्री. पटनाईक ( सध्यांचे ओरिसाचे मुख्य मंत्री ), सौ. पटनाईक आणि इतर १२ भागदार होते.

१९५४ मध्यें कंपनी आर्थिक अडचणींत होती, त्या वेळीं श्री. पटनाईकांचा गट आणि श्री. जैन ह्यांचेमध्यें एक करार होऊन श्री. जैन हे कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन झाले. कंपनीचें पुढें पब्लिक लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें. हा करार कंपनीवर बंधनकारक आहे, असा श्री. जैन ह्यांचा दावा होता, तर पटनाईक गटाला तो बंधनकारक वाटत नव्हता.

कोर्टानें असें मत व्यक्त केलें, कीं श्री. जैन ह्यांनीं कंपनीच्या कारभारांत लक्ष घातलें म्हणून कंपनीला आर्थिक अडचणींतून बाहेर पडण्यास मदत झाली; ते चेअरमन होते म्हणून कंपनीला कर्जे मिळूं शकलीं.

१९५८ सालीं ३९ लक्ष रुपयांचे नवे शेअर्स ॲलॉट करावयाचे होते. अर्जदार श्री. जैन ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें, हे शेअर्स तीन गटांत सारखे विभागून द्यायला हवे होते. पण, भागदारांची एक एक्स्ट्रॉ–ऑर्डिनरी सभा बोलावण्यांत येऊन सौ. पटनाईक ह्यांनीं ठराव मांडला, कीं हे शेअर्स विद्यमान भागदारांना देण्यांत येऊं नयेत; तो ठराव मंजूर झाला. ह्याविरुद्ध श्री. जैन ह्यांच्या अर्जावरून सबॉर्डिनेट कोर्टानें ह्या ठरावाची अंमलबजावणी तहकूब करावी, असा आदेश दिला. कांहीं तासच हें इंजक्शन अंमलांत नव्हते. इंजक्शन रद्द करण्याचा कोर्टाचा हुकूम प्रतिवादींनीं मिळवला आणि तो मिळतांच ४० मिनिटांचे आंत हे नवे शेअर्स ॲलॉट करूनहि टाकण्यांत आले.

थोड्याच महिन्यानंतर, गेल्या वर्षाच्या सप्टेंबरमध्यें, कंपनीचे भाग भांडवल १ कोटि रु. चे ३ कोटि रु. करण्याचा विचार होता, परंतु हायकोर्टानें त्याला प्रतिबंध केला. न्यायमूर्ति बर्मन ह्यांनीं श्री. जैन आणि इतर दोघे ह्यांचेमधील मूळ करार कायदेशीर आणि बंधनकारक धरला. " श्री. जैनप्रभृति अल्पसंख्याक भागदारांचे हक्क हिरावून घेण्यासाठींच नवे शेअर्स मुद्दाम घाईनें ॲलॉट करून टाकण्यांत आले होते ", असें न्यायमूर्तींनीं आपलें मत नमूद केलें आहे. प्रतिवादी बहुसंख्य भागदारांचें वर्तन जुलमी आणि अप्रस्तुत असल्याचेंहि न्यायमूर्तींनीं म्हटलें आहे. कंपनी गुंडाळण्याजोगी तिची अवस्था आहे, पण त्यामुळें अर्जदारांच्या हितास बाध येईल. म्हणून हायकोर्टानें जुलूम नाहींसा व्हावा ह्या दृष्टीनें हुकूम केला, कीं कंपनीच्या सर्व डायरेक्टरांनीं आपली जागा तात्काळ खाली करावी ( ओरिसा सरकारचा आणि इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचा प्रतिनिधि ह्यांना हा हुकूम लागू नाहीं. ), बोर्डाची कांहीं मुदतीपुरती फेररचना करण्यांत यावी, तीनहि गटांतले प्रत्येकी दोन असे डायरेक्टर्स बोर्डावर असावेत, पुढच्या वार्षिक सभेपर्यंत ह्या बोर्डानें काम करावें, डायरेक्टरांची निवडणूक प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन बाय सिंगल ट्रान्स्फरेबल व्होट ह्या पद्धतीनें करण्यांत यावी, दोन गटांच्या हातीं असलेल्या ३९,००० शेअर्सपैकीं एकतृतीयांश शेअर्स जैन गटाला विकण्यांत यावेत, इत्यादि हुकूम हायकोर्टानें केले आहेत.

## मालाचा ट्रॅन्झिट इन्शुअरन्स

### 'ओनर्स रिस्क' आणि 'रेल्वे रिस्क' ह्यांतील फरक

कर्जाला तारण म्हणून बँका रेल्वे रिसिटा पत्करतात. त्या दोन प्रकारच्या असतात : 'ॲट ओनर्स रिस्क' आणि 'ॲट रेल्वे रिस्क'. कुणाच्या जोखमीवर मालाची वाहतूक केली जात आहे, त्यावर हा प्रकार अवलंबून असतो. वाहतुकींत होणाऱ्या सर्व प्रकारच्या नुकसानीचा 'रेल्वे रिस्क' मध्यें समावेश होतो, अशी कांहीं बँकांची कल्पना असते. 'ओनर्स रिस्क' असला, म्हणजे बँका वहातुकीचा विमा उतरवून घेतात, तसा 'रेल्वे रिस्क' च्या बाबतींत त्यांना आवश्यक वाटत नाहीं.

नुकतेंच असें घडलें, कीं एका बँकेनें रेल्वेमार्गानें माल पाठविणाऱ्याला विमा उतरायला सांगितला, पण 'रेल्वे रिस्क' नें माल पाठवला आहे ह्यासाठी त्यानें विमा उतरण्याचें नाकारलें. म्हणून, " रेल्वे रिस्क " ह्याचा नेमका अर्थ समजून घेण्याकरितां नॉर्दर्न रेल्वेच्या चीफ कमर्शिअल सुपरिंटेंडेंटकडे पृच्छा केली. त्यांनीं सांगितलें, कीं 'रेल्वे रिस्क' चें स्वरूप 'बेली' च्या जोखमीसारखें असतें. म्हणजे, रेल्वेनें रास्त काळजी घेतलेली असेल, तर मालाच्या नुकसानीची, तो गहाळ होण्याची किंवा खराब होण्याची जबाबदारी रेल्वेवर नाहीं; नुकसानभरपाई रेल्वे करणार नाहीं. उदाहरणार्थ, माल जळून नष्ट झाला आणि रेल्वेचा हलगर्जीपणा नसेल, तर ती त्याला जबाबदार नाहीं.

जेव्हां 'रेल्वे रिस्क' नें मालाची वाहतूक होते, तेव्हां आपल्या हातून हलगर्जीपणा झाला नाहीं हें सिद्ध करण्याची जबाबदारी रेल्वेवर असते. 'ओनर्स रिस्क' च्या बाबतींत, रेल्वेनें हलगर्जीपणा केल्याची शाबिती मालकानें करावयाची असते; त्या खेरीज त्याला रेल्वेकडून नुकसानभरपाई मिळूं शकत नाहीं.

### कोळशाच्या खाणींसाठी परदेशीय मदत

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतामधील कोळशाच्या खाणींचें आधुनिकीकरण करण्यांत येणार आहे. खाजगी मालकीच्या खाणींचा विस्तार करण्याच्या कामासाठी जागतिक बँकेनें ह्यापूर्वी ३·५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलेलें आहे. आतां भारत सरकारतर्फे खाणमालकांना आणखी १ कोटी डॉलर्स देण्यांत येणार आहेत. जागतिक बँकेच्या मदतयोजनेंत कोणत्या खाणींना मदत द्यावी तें ठरविण्याचें काम एका तांत्रिक कमिटीकडे सोंपविण्यांत आलें होतें. कमिटीनें आपलें काम नुकतेंच पुरें केलें आहे. खाणींचें आधुनिकीकरण करण्यासाठीं कोणत्या प्रकारच्या यंत्रसामग्रीची जरूर आहे तें कमिटीनें ठरविलें असून त्यापैकीं कोणती परदेशांत मिळूं शकेल ह्याचाहि कानोसा घेतला आहे. त्याप्रमाणें खाणमालकांनीं यंत्रसामग्रीच्या खरेदीला आरंभहि केला आहे. गेल्या कांहीं महिन्यांत कमिटीच्या सभासदांनी खाजगी मालकीच्या ज्या खाणींतर्फे मदतीची मागणी करण्यांत आली होती त्या खाणींना भेटी दिल्या आणि त्यांच्या यंत्रसामग्रीच्या गरजेची जागेवर पहाणी केली. दरम्यान, भारत सरकारच्या पोलाद व इंधन खात्यातर्फे एक उच्चाधिकार कमिटी स्थापन करण्यांत आली असून, जागतिक बँकेतर्फे मिळणाऱ्या मदतीचा उपयोग कसा करण्यांत यावा यासंबंधीं विचारविनिमय करण्यांत आला आहे. ह्या कमिटींत कोळशाच्या खाणींचे मालक, व्यापारी बँका व इतर द्रव्यविषयक संस्था आणि भारत सरकार ह्यांचे प्रतिनिधी होते. व्यापारी बँका आणि इतर द्रव्यविषयक संस्था ह्यांनीं खाणींच्या मालकांना कर्जे द्यावीं म्हणून त्यांचें मन वळविण्यासाठीं कमिटीच्या बैठकींत प्रयत्न करण्यांत आले. परंतु व्यापारी बँकांनीं ह्या बाबतींत फारशी आस्था दाखविली नाहीं.

## दाणे आणि खडे

'दाणे आणि खडे' हें आपलें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें पुस्तक वाचले. 'कण आणि क्षण', 'पुढे पाऊल' आणि 'तुमचें स्थान कोणतें' यांच्या पावलावर पाऊल टाकून आलेल्या या धाकट्या भावंडानं आपले कांहीं वैशिष्ट्यपूर्ण आणि नवीन गुण अपेक्षेप्रमाणें दाखविले यांत शंकाच नाहीं.

'दाणे आणि खडे' या लेखसंग्रहांतल्या प्रत्येक लेखानं हलूवारपणें, घरगुती शब्दांत आणि तरीहि अचूक मार्गदर्शन केलें आहे. सर्वच लेख आपापल्या परीनं मार्गदर्शक आहेत. तथापि 'दगडफेक', 'आपली'चा 'सप्रेम' नमस्कार,', 'फुकटखाऊंचा सामाजिक जीवनांत धुडगूस', 'मित्राच्या मोटारींत बसण्याची कला', 'नोकरीच्या रानांतील फांसेपारधी', 'बेरंगांतून रंगदार सुटका', 'काय करायला हवें होतें?' या लेखांतील चर्चा, त्या विषयांच्या माझ्या दैनंदिन व्यवहारांतील परिचयामुळें, मला अतिशय जिवाळ्याची वाटली.

'आपली'चा 'सप्रेम नमस्कार' या लेखामध्यें नवीन परिचयाचे वेळीं निर्माण होणाऱ्या प्रश्नांची अतिशय सहजपणें सोडवणूक झाली आहे. 'फुकटखाऊंचा सामाजिक जीवनांत धुडगूस' या लेखांतील व्यक्तिचित्रें मूर्तस्वरूपांत नेहमींच आपल्या मार्गांत कुठेंतरी 'दत्त' म्हणून भेटतात. कठोर वागून एक वाईटपणा तरी स्वीकारावा लागतो नाहींतर खिशाला बसेल तेवढी चाट मुकाट्यानें सहन करावी लागते. त्यामुळें आपण आपल्या या लेखांत चर्चिलेला हा प्रश्न फारच निकटचा असल्यानें चर्चा फार उद्बोधक वाटली. 'काय करायला हवें होतें?' या लेखांतील प्रश्नोत्तर रूपानें केलेलें अचूक मार्गदर्शन खरोखरच उल्लेखनीय आहे.

बदलत्या काळाचीं पावलें ओळखून इतरहि लेखांमधें व्यावहारिक प्रश्नांची केलेली चर्चा, आलेल्या परिस्थितीला धीरानें तोंड कसें द्यावें याचा एक उत्कृष्ट संदेश सहजपणें देऊन जाते. बदलत्या काळाच्या पाऊलवाटेवरून जात असतांना देखील शाश्वत मूल्यांच्या जुन्या संस्कृतीचीं वस्त्रें आपल्या अंगावर असलीं पाहिजेत याहि एका महत्त्वाच्या संदेशाची पार्श्वभूमि आपल्या सर्व लेखांच्या चर्चेमागें उभी करण्यांत आपण दाखविलेलें कौशल्य निश्चित वाखाणण्यासारखें आहे. त्यामुळें प्रत्येक लेखांत जुन्या-नव्या संस्कृतीचा झालेला उत्कृष्ट मिलाफ नकळत जाणवतो.

आणि म्हणूनच सुरवातीला या धाकट्या भावंडानं कांहीं वैशिष्ट्यपूर्ण आणि नवीन गुण अपेक्षेप्रमाणें दाखविलें आहेत असं मुद्दाम नमूद केलं आहे.

व्यवहाराचा प्रवाह असाच वाहात रहाणार आहे. बदलत्या काळामुळें त्याला अनेक ठिकाणीं वेडींवाकडीं वळणें घ्यावीं लागणार आहेत. पण अशा वळणावर ठिकठिकाणीं उभ्या असलेल्या परिस्थितीच्या खडकांवर न आपटतां प्रवाहांतून सुखरूप प्रवास करतांना कण आणि क्षणांची पारख करत पुढें पाऊल टाकतांनाहि आपलें स्थान कुठे याचाहि विचार केला पाहिजे. पण नुसताच विचार किंवा पदरीं पडलं पवित्र झालं ही निष्क्रियता असण्यापेक्षा पदरीं पडलेल्या धान्यांतले दाणे घेऊन खडे बाजूला टाकण्याची चतुराई ज्याला साधेल, तोच प्रगमनशील आणि यशस्वी होऊं शकेल.

आपल्याकडून अशाच अचूक मार्गदर्शनाची नम्र अपेक्षा आपला वाचकवर्ग करीत आहे हें शेवटीं आग्रहानें नमूद करतों.

शेवटीं पुन्हा एकदां धन्यवाद!

पुणें २ आपला नम्र,
६ डिसेंबर १९६१. शशिकान्त कुलकर्णी

**दाणे आणि खडे**

लेखक: श्री. वा. काळे, संपादक "अर्थ"
प्रकाशक: व्हीनस प्रकाशन पुणें २. [किंमत: रु. २-५०

## प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

### ठेवीदारांना किमान २५० रु. देणारी स्कीम ऑफ अरेंजमेंट

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेवर मोरेटोरियमचा हुकूम दि. २२ मार्च, १९६१ रोजीं रिझर्व्ह बँकेनें बजावला; तेव्हांपासून ती बँक पूर्णपणें बंद आहे. महाराष्ट्र बँकेंत तिचें विलिनीकरण होईल असें वाटत होतें, पण तसें घडलें नाहीं आणि रिझर्व्ह बँकेनें ही बँक गुंडाळण्यांत यावी असा मुंबई हायकोर्टांत अर्ज केला. त्या अर्जाचा विचार चालू आहे. बँकेचें वाइंडिंग अप होण्याऐवजीं "स्कीम ऑफ अरेंजमेंट" करून ती कंपनी बँक ऑफ कराड किंवा दुसरी एखादी बँक ह्यांत विलीन होणें ठेवीदारांच्या दृष्टीनें हितावह आहे असें वाटल्यावरून कंपनीनें हालचाली सुरू केल्या. बँक ऑफ कराड, प्रेसिडेन्सी बँकेला विलीन करून घेण्यास तयार आहे. तिच्या अटींना प्रेसिडेन्सी बँकेच्या डायरेक्टर बोर्डाची मान्यता आहे.

स्कीम ऑफ अरेंजमेंटप्रमाणें, विलिनीकरणानंतर तीन महिन्यांच्या आंत बँक ऑफ कराड (किंवा इतर सोईची ट्रान्स्फरी बँक) ठेवीदारांचें कांहीं मर्यादेपर्यंतचे देणें रोखीनें देऊन टाकील; बाकीचें देणें प्रेसिडेन्सी बँकेच्या येण्याची वसुली होईल त्याप्रमाणें प्रो रेटा दिलें जाईल. ह्या स्कीमचा १८,४८,००० रु. च्या ठेवी असलेल्या सुमारें ५,००० ठेवीदारांना फायदा मिळेल. प्रत्येक ठेवीदाराला त्याच्या खात्यांतील रक्कम किंवा २५० रु. (जी रक्कम कमी भरेल ती) देण्यास ३,७५,००० रु. लागतील; ती आज रोखीनें तयार आहे. ठेवीदारांना २२ मार्च, १९६१ नंतरचें व्याज मिळणार नाहीं. विलिनीकरणानंतर १२ वर्षांनींहि प्रेसिडेन्सी बँकेच्या कांहीं येण्याची वसुली राहिली, तर त्यावेळीं त्या उरलेल्या येण्याचें मूल्यमापन करून होईल ती रक्कम ठेवीदारांना प्रो-रेटा वांटली जाईल.

ह्या स्कीमचा विचार करण्यासाठीं मुंबई हायकोर्टातर्फे ठेवीदारांच्या दोन सभा बोलाविण्यांत आल्या आहेत. हेड ऑफिसच्या ठेवीदारांची सभा मंगळवार दि. ९ रोजीं पुणें येथें भरेल आणि मुंबई शाखेच्या ठेवीदारांची सभा सोमवार दि. ८ रोजीं मुंबई येथें भरेल. स्कीमला ठेवींच्या रकमेच्या तीन चतुर्थांशाइतकी मतें मिळून मान्यता मिळाली आणि हायकोर्टानें तिला मंजुरी दिली म्हणजे ती सर्व ठेवीदारांवर बंधनकारक होईल. हायकोर्टाची मंजुरी मिळताच ती अंमलांत येईल.

प्रेसिडेन्सी बँकेचें दि बँक ऑफ कराडमध्यें विलिनीकरण आणि त्या संबंधींतील स्कीम ऑफ ॲमलगमेशन ह्यांस मान्यता मिळविण्यासाठीं दि बँक ऑफ कराडच्या डायरेक्टर बोर्डानें बँकेच्या भागदारांची सभा दि. १२ रोजीं बोलाविली आहे.

### बँकांच्या मजबुतींत वाढ

बँकांचें वसूल भांडवल आणि गंगाजळी ह्यांचें ठेवींशीं पडणारें प्रमाण उतरत चाललें आहे. ही परिस्थिति सुधारण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्त्या सुचविल्या आहेत. त्या दुरुस्त्याप्रमाणें ठराविक प्रमाणांत येण्यासाठीं बँकांना कांहीं ठराविक मुदत दिली जाईल. हीं प्रमाणें वाढविण्याची घाई करूं नये; नव्या भांडवल उभारणीमुळें डिव्हिडंडचा दर फार कमी होता कामा नये; असें इंडियन बँक्स असोसिएशननें सुचविलें आहे. कर्जदारांना उत्पादक कार्यासाठीं कर्जे मिळणें अवघड जाऊं नये, त्यासाठीं व्याजहि फार पडूं नये, लिक्विडिटी चांगली असावी, हेंहि उद्देश सर्वमान्य आहेत. पण वाढत्या कर्जमागणीच्या मानानें वसूल भांडवल, गंगाजळी आणि ठेवी वाढतील का, हा खरा प्रश्न आहे.

**भांडवल उभारणीस परवानगी** — भांडवल-उभारणी-संबंधीच्या कचेरीनें ३ नव्या कंपन्या, ५ चालू कंपन्या आणि २ बँका ह्यांना नवीन भांडवल उभारण्याची परवानगी दिली आहे. सर्वांचें मिळून नवें भांडवल ५·४५ कोटी रुपयांचें आहे. ह्यापैकी ९ कंपन्यांचें भांडवल ऑर्डिनरी भाग-भांडवलाचें आहे. एका कंपनीला डिबेंचर्स काढण्याची परवानगी दिलेली आहे. सर्व कंपन्यांना भांडवल उभारणीसाठी १२ महिन्यांची मुदत देण्यांत आली आहे.

**सहकारी कारखान्याचा अभ्यास**—भारतामधील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेंतील एक सहकारी मंडळ श्रीरामपूरला आलें होतें. त्या वेळीं सहकारी साखर कारखान्यांच्या फेडरेशनचे अध्यक्ष श्री. शिंदे ह्यांनीं साखरेच्या कारखान्यांत उपलब्ध होणाऱ्या उपपदार्थांपासून नवीन वस्तु तयार करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

**व्यवसायावरील कर**—नागपूर कॉर्पोरेशननें व्यवसायांवर बसविलेल्या करांबाबत नागविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सनें दुरुस्ती सुचविली आहे. चेंबरच्या मतानें ५ हजार ते १० हजार पर्यंतच्या उत्पन्नावरील व्यवसायकर २० ऐवजीं १५ रुपये करावा, १० हजार ते १५ हजार उत्पन्नावरील ५० ऐवजीं २५ रुपये करावा, आणि ५० हजारांवरील उत्पन्नावरील व्यवसायकर १०० ऐवजीं ५० रुपये करावा.

**अमेरिकेकडे कापसाची मागणी**—भारत सरकारनें अमेरिकेकडून ३ लाख गासड्या कापसाची तातडीची मागणी केल्याचें वृत्त आहे. कापड गिरण्यांना कापसाचा पुरवठा अव्याहत चालू राहावा म्हणून भारताला ह्या वर्षीं ६ लाख गासड्यांची गरज लागेल असेंहि कळविण्यांत आलें आहे. अमेरिकेकडून कापूस मिळाला नाहीं तर १९६२ च्या मार्चमध्यें कापसाचा तुटवडा पडण्याची भीति आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

[ टेलि. : २७०१४   सारस्वत बँक-गृह, मुंबई ४.   [ स्थापना : १९१८

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लाख |
| शेअर भांडवल : | ... ... | रु. | १०·०० |
| वसूल भांडवल | ... ... | रु. | ८·११ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् : | ... ... | रु. | १०·६० |
| ठेवी : | ... ... | रु. | १५१·७१ |
| खेळतें भांडवल : | ... ... | रु. | १८०·८८ |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव.

महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवारी लेन, मुंबई ४.



किर्लोस्कर

लोखंडी नांगर

हलक्या, मध्यम प्रतीच्या व रगाड जमीनीच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे लहान मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमीनीच्या मगदुरा प्रमाणे योग्य त्या नांगराची निवड करा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी
(जि. सांगली)

### मोठ्या शहरांतील कारखान्यांमुळें धोका

जगांतील सर्व मोठ्या शहरांतील कारखान्यांच्या धुराड्यांतून रोज शेंकडों टन सूक्ष्म धूलीकण हवेंत फेकले जातात. नंतर ते आसपासच्या प्रदेशांतील जमिनीवर पडतात. ह्या धुलीकणांमुळें शहरांतील लोकांच्या आरोग्याला फार मोठा धोका उत्पन्न होतो. हा धोका टाळण्याची युक्ती एका पोलिश शास्त्रज्ञानें शोधून काढली आहे. ह्या युक्तींत सामान्यपणें कानांना ऐकूं न येणाऱ्या ध्वनिलहरींचा उपयोग करण्यांत आला आहे. अशा प्रकारच्या सूक्ष्म ध्वनिलहरी निर्माण करणारी एक शिटी धुराड्याला बसविण्यांत येते. शिटी वाजविल्यावर धुरांतील सूक्ष्म घनकण एकत्रित होऊं लागतात व त्याचे मोठे कण होतात. हे मोठे झालेले धूलीकण धुराड्यांत बसविण्यांत येणाऱ्या नेहमींच्या चाळण्यांच्या साह्यानें पकडतां येतात.

---

### सायकलींच्या उत्पादनांत वाढ

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत छोट्या उद्योगधंद्यांच्या द्वारां करण्यांत येणारे सायकलींचे उत्पादन दुप्पट करण्यांत येणार आहे. ह्या कार्यक्रमाच्या अखेरीस दरसाल ५ लाख सायकली उत्पादन करण्याचें लक्ष्य ठरविण्यांत आलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभापासून छोट्या उद्योगधंद्यांच्या द्वारां होणारे सायकलींचे उत्पादन हळूहळू वाढत चाललेलें आहे. १९५६ साली २५,५३२ सायकली निर्माण करण्यांत आल्या होत्या. १९६० सालीं सायकलींचे उत्पादन २·३ लाखापर्यंत वाढलेलें दिसून येतें. दुसऱ्या कार्यक्रमांत २·५ लाख सायकलींच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. तें गांठण्याच्या कामी बरेचसे यश आलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

### भारतांत भांडवल गुंतविण्याची तयारी

इंडिअन इन्व्हेस्टमेंट सेंटरचे अध्यक्ष श्री. गगनविहारी मेहता, ब्रिटनचा व अमेरिकेचा दौरा करून भारतांत परत आले आहेत. दौऱ्यांतील अनुभवाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, गेल्या कांहीं वर्षांत भारतांत भांडवल गुंतविण्यासाठी परदेशीय भांडवलदारांची उत्सुकता वाढलेली आहे. भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या चौकटींत बसत असेल तर परदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीला उत्तेजन देण्याचें भारत सरकारचें धोरण आहे. भारतांत येणारें परदेशीय भांडवल आणि भारतामधील भांडवल ह्यांच्यांत भेदभाव न करण्याच्या सरकारच्या धोरणामुळें परदेशीय भांडवल अधिक धीट झालेलें आहे. ह्याचा फायदा घेऊन परदेशी भांडवलाचें सहकार्य अधिक प्रमाणांत मिळविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. आतांपर्यंत इन्व्हेस्टमेंट सेंटरकडे २५ परदेशीय भांडवलदारांच्या विचारणा आल्या आहेत.

---

### पाकिस्तानचा पोलादाचा कारखाना

पाकिस्तानचे उद्योगमंत्री मि. अबदुल कासीम खान ह्यांनीं असें जाहिर केलें आहे कीं, कराची येथें पोलादाचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे ह्या कारखान्यांतून दरसाल ३,५०,००० टन पोलादाची निर्मिति करतां येईल. कारखान्याच्या उभारणीसाठी ६७ कोटी रुपये खर्च येणार असून तो उभारण्याचें काम १९६५ अखेर पुरे होण्याची शक्यता आहे. कारखाना उभारण्याच्या कामीं एका अमेरिकन कंपनीचें सहकार्य मिळविण्यांत आलें आहे. ही कंपनी तांत्रिक मदतीबरोबरच एकूण भांडवलाच्या ३० टक्के भांडवल गुंतविण्यासहि तयार आहे. बाकीचें भांडवल पाकिस्तानमधील भांडवलदारांकडून जमविण्याचा प्रयत्न करण्यांत येईल.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




वेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गिरगांव, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**कौटुंबिक हितगुज**

श्री. वा. काळे ह्यांनीं अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत लिहिलेल्या लेखमालेनें ' किर्लोस्कर 'च्या हजारों वाचकांची पकड घेतली आहे. ह्या लेखमालेंतील निवडक लेख एकत्रित केलेला संग्रह ' किर्लोस्कर प्रेस 'तर्फे प्रसिद्ध झाला आहे.

पृ. सं. ११९ ] [ किंमत ३ रु.

**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक :– श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

## बँकिंगच्या व्यवसायांतील अलिखित आचार–संहिता

### गिऱ्हाइकांच्या व्यवहाराविषयी गुप्तता

विशिष्ट परिस्थितींत योग्य कोणतें आणि अयोग्य कोणतें, ह्याबद्दल बहुसंख्य लोकांचें सहमत झालें म्हणजे ती रुढि बनते; तिचें नियमांत रूपांतर होतें. मग ज्यांची सद्सद्विवेक बुद्धि काटेकोर नसते त्यांचेवरहि नियम पाळण्याची सक्ती करता येते. वातावरण, शिक्षण, इत्यादींचा मनुष्याच्या विवेकावर परिणाम होत असतो. युक्तायुक्त कोणतें ह्याविषयीं सर्वांचें एकमत त्यामुळें होऊं शकत नाहीं. लक्ष्मी पथावरील नामवंत दुकानांत जी सचोटी आढळेल, त्यामानानें हातगाडीवरून माल विकणाऱ्या फिरत्या लोकांजवळ बहुधा आढळणार नाहीं. तथापि, स्वार्थाला थोडा आळा घालूनहि, व्यापक हिताला पोषक अशी आचार–संहिता सुविचारी लोक पाळीत आले आहेत.

सुमारें २,००० वर्षांपूर्वी ग्रीक लोकांनीं संस्कृति आणि तत्त्वज्ञान ह्यांत इतकी प्रगति केली आणि आचाराचे नियम घालून दिले, कीं ते आजहि मार्गदर्शक ठरले आहेत. हिपोक्रेटस ह्या धन्वंतरीनें वैद्यांनीं पाळावयाचे नियम सांगितले आहेत ते 'हिपोक्रेटस शपथ' ह्या नांवानें आजहि ओळखले जातात आणि नवे डॉक्टर व्यवसायास प्रारंभ करण्यापूर्वी ती शपथ घेतात! बँकिंगच्या व्यवसायासहि हिपोक्रेटसची संहिता पूर्णत्वानें लागू आहे. त्यांतील एक परिच्छेद येथें उद्धृत केला आहे.

"मी कुठल्याहि घरांत गेलों तरी तेथील आजाऱ्यांच्यासाठी शिकस्त करीन; कशाचाहि गैरफायदा घेणार नाहीं. तेथें मला जें काय दिसेल किंवा ऐकूं येईल, तें इतरांना कळता कामा नये असें असल्यास मी त्याबद्दल पूर्णपणें मौन राखीन; कुठेंहि वाच्यता करणार नाहीं."

बँकिंगच्या व्यवसायांतील सर्वमान्य नियम—गुपितें कटाक्षानें राखण्याचा—हिपोक्रेटसच्या संहितेंत सापडतो! आपल्या गिऱ्हाइकांच्याविषयीं जी माहिती बँकरला मिळेल ती त्यानें गुप्त राखली पाहिजे. खात्यांत शिल्लक किती आहे, ठेवींच्या रकमेचें उगमस्थान कोणतें, कुणाच्या नांवानें चेक काढले जातात, धंद्याचें स्वरूप काय आहे, वैयक्तिक चारित्र्य कसें आहे, ह्याची वाच्यता करायची नाहीं. तो काय खरेदी करतो आणि काय विकतो, ह्यावरून त्याच्या जीवनाची कल्पना करता येते; बँकेनें तिची इतरांजवळ वाच्यता करता कामा नये.

ही सर्व माहिती बँकेच्या रेकॉर्डांत असते. तें बँकेतल्या कुणालाहि उपलब्ध होण्याजोगें असतें. बँकेच्या सर्व नोकरांना, अगदी शिपायाला सुद्धा, तोंडाला कुलूप लावून हिंडण्याची सवय लावली पाहिजे. गिऱ्हाइकाची ठेव ही त्याची खासगी बाब. त्याच्या वापराविषयी चर्चा करण्याचा अधिकार शेजाऱ्यांना, मित्रांना नाहीं तसा बँक नोकरांनाहि नाहीं. कुणी मुद्दाम दुष्ट हेतूनें अशी चर्चा करतात असें येथें सुचवावयाचें नाहीं. पण इतरांच्याबद्दल स्वैरपणें बोलणें ही मनुष्याची प्रवृत्ति आहे. तिला आळा घालायला हवा. बहुतेकांना जबाबदारी ओळखून ही गोष्ट आचरणांत आणणें कठीण वाटणार नाहीं.

---

## भिकाऱ्यांची मागणी : गरम पाणी आणि रेडिओ हवा

कोइमतूर येथील म्युनिसिपल बेगर होमची पाहाणी करण्यासाठी कांहीं कार्यकर्ते गेले होते. त्यांनीं भिक्षेकऱ्यांच्या त्या आश्रमांतील भिकाऱ्यांना "तुमच्या कांहीं अडचणी आहेत का?" असें विचारलें. तेव्हां, "आम्हांला स्नानाला गरम पाणी आणि करमणुकीसाठी रेडिओ हवा" असें उत्तर मिळालें!

## रोगपरिहारार्थ योगासनांचा उपयोग

रोगपरिहारार्थ योगासनांचा कितपत उपयोग होतो तें अजमावण्यासाठी भारत सरकारच्या शिक्षण खात्यानें आरोग्य खात्याच्या सल्ल्यानें एक कमिटी नेमली होती. कमिटींत चार वैद्यकीय तज्ज्ञ होते. कमिटीच्या सभासदांनीं योगविषयक काम करणाऱ्या ७१ संस्थांना प्रश्नपत्रिका पाठविल्या होत्या. शिवाय १९ योगविषयक संस्थांना सभासदांनीं स्वत: भेटीहि दिल्या. योगासनांचा रोगनिवारणार्थ काय उपयोग होतो तें पाहाण्यासाठी सरकारनें १० योगविषयक संस्थांना शास्त्रीय संशोधन करण्याच्या कामीं मदत करावी, अशी शिफारस कमिटीनें केली आहे.

---

## रूरकेला येथील तिसरी झोतभट्टी

रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांतील तिसरी झोतभट्टी लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. भारतामधील सार्वजनिक मालकीच्या तिन्ही पोलादाच्या कारखान्यांचा विस्तार करण्यांत येणार असल्यामुळें हिंदुस्थान स्टील ह्या खाजगी मालकीच्या कंपनीनें आपल्या भांडवलाची पुनर्रचना करण्याचें ठरविलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पोलादाच्या चौथ्या कारखान्याचें कामहि हातीं घेण्यांत येणार आहे.

---

## किर्लोस्कर ब्रदर्स लि.

जुलै, १९६१ अखेर संपलेल्या वर्षी किर्लोस्कर ब्रदर्स लि. नें एकूण ३·१६ कोटि रु. किंमतीची विक्री करून आणि सर्व प्रकारच्या भरपूर तरतुदी करून १०,५२,५६८ रु. नफा मिळविला. ह्यापूर्वीच्या वर्षी २·३५ कोटि रु. ची विक्री होऊन ६,९९,४१८ रु. नफा झाला होता.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

**शेड्यूल्ड बँक**

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४ टक्के, २ वर्षे–४·२५ टक्के, ३ वर्षे–४·५० टक्के, ४ वर्षे–४·७५ टक्के, ५ वर्षे–५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारल्या जातात. तसेंच कंपल्सरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनी अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा विस्तार**

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगाव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. इलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ४ ३०,००० |
| ठेवी | रु. | २,८७,११,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,२१ ००,००० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी. चेअरमन.

### भाक्रा-नांगल योजना पूर्ण होत आली

भाक्रा-नांगल विकास योजना आतां पूर्ण होत आली आहे. भाक्रा धरणाच्या डाव्या तीरावरील विद्युत्-निर्मिति केंद्राचें उद्घाटन पं. नेहरू ह्यांच्या हस्तें नुकतेंच झालें. विकासयोजना पूर्ण होत आल्याची ही एक सूचक म्हणण्यास हरकत नाहीं. उद्घाटन करण्यांत आलेल्या वीजकेंद्रांत प्रत्येकी ९०,००० किलोवॅट वीज उत्पन्न करणारे पांच जनरेटर्स बसविण्यांत आलेले आहेत. आशिया खंडांतील हें सर्वांत मोठें वीजकेंद्र असून तें उभारण्याच्या कामीं २२·२२ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. गेल्या कांहीं वर्षांत पंजाबमधील औद्योगीकरणाची गति खूपच वाढत गेली. त्यामुळें अर्थातच औद्योगिक शक्तीची म्हणजेच विजेची मागणीहि वाढत गेली. सध्यांच तेथील कारखान्यासाठी २०,००० किलोवॅट वीज लागत आहे. नांगल येथील खताच्या कारखान्यासाठी लागणारी व दिल्लीसाठी लागणारी वीज लक्षांत घेतली तर विजेची मागणी लवकरच ४ लाख किलोवॅटपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. भाक्रा-नांगल योजना पूर्ण झाली म्हणजे पंजाबप्रमाणेंच राजस्थानची आर्थिक ठेवणहि बदलणार आहे. उद्योगधंद्यांना लागणारी शक्ति पुरविण्याचेंच कार्य ही योजना करणार आहे असें नाहीं. राजस्थान आणि पंजाब ह्या राज्यांतील हजारो एकर ज़मीन पाण्याच्या अभावीं ओसाड पडलेली आहे. ह्या जमिनीला पाणीपुरवठा करणें योजना पूर्ण झाल्यावर शक्य होईल, आणि मग ओसाड माळरान जमिनीचें रूपांतर सुपीक शेतींत करतां येईल. पाणीपुरवठ्याच्या दृष्टीनें पंजाबपेक्षाहि राजस्थानला अधिक फायदा होणार आहे. भारताच्या औद्योगिक विकासांत पोलाद कारखाने आणि विद्युत्-निर्मिति-केंद्रें ह्यांना फार महत्त्व आहे. भाक्रा-नांगल योजना त्या दृष्टीनें विशेष उल्लेखनीय आहे.

### दिल्लीमधील औद्योगिक प्रदर्शन

दिल्ली येथें भरविण्यांत आलेले १९६१ चें औद्योगिक प्रदर्शन पहाण्यासाठी लोकांची तोबा गर्दी होत आहे. प्रदर्शन १ जानेवारी पर्यंत चालू राहील. १९५५ सालच्या प्रदर्शनापेक्षा ह्या प्रदर्शनांत अधिक उद्योगधंद्यांनीं भाग घेतला आहे. पूर्वीच्या प्रदर्शनापेक्षा ह्या प्रदर्शनानें अडीचपट अधिक जागा व्यापली आहे. प्रदर्शनांत उभारण्यांत आलेल्या महत्त्वाच्या हिंदी मंडपांसाठी सरासरी १ ते २ लाख रुपये खर्च आलेला आहे. परदेशांतील १८ उद्योगधंद्यांनीं आपले मंडप उभारले असून ३५ कोटी रुपयांची यंत्रसामग्री आणली आहे. सर्व प्रदर्शन पहावयाचें म्हटल्यास ३५ मैलांची चाल करावी लागेल. प्रदर्शनांचा हेतु मालाची देवाणघेवाण वाढावी असा असतो. पण दिल्लींतील प्रदर्शनें मंडप उभारणाऱ्या व ते मोडणाऱ्या कंत्राटदारांसाठी भरविण्यांत येतात की काय, अशी शंका येते. ह्यापैकी एक कंत्राटदार ६० लाखांचा नफा मिळविण्याची आशा करून आहे असें म्हणतात. त्या खालोखाल आणखी कांहीं कंत्राटदार १५ पासून २७ लाखापर्यंत नफा मिळविण्याची उमेद धरीत आहेत. कांहीं चित्रकार व इतर कलावंत ५० हजारापासून १ लाखापर्यंत कमाई करीत आहेत. ह्या उधळपट्टीबद्दल हिंदी उद्योगधंद्यांवर टीकाही करण्यांत येते. त्यांतच परदेशीय उद्योगधंदेवाल्यांच्या स्पर्धेची भर पडते. एकंदरीनें असल्या प्रदर्शनांत पैशाचा व्यय मुक्त हस्तानें करण्यांत येतो. असलीं प्रदर्शनें दिल्लींतच भरविण्यांत येतात आणि तीं पहाण्यासाठी पुन्हा तीच तीच माणसें येतात. प्रदर्शन आटोपल्यावर लाखो रुपये खर्चून उभारलेली सिमेंटची कामें पाडून टा... येतात, आणि प्रदर्शनापासून कांहीं मैलावरच गलिच्छ वस्त्या दिसून येतात.

### कॉंगो प्रकरणीं युनायटेड नेशन्सचा खर्च

कॉंगो प्रकरणीं युनायटेड नेशन्सचा जो खर्च होत आहे, त्याला हातभार लावण्याची जबाबदारी सर्व सभासद-देशांवर आहे किंवा नाहीं, ह्याबाबत जनरल असेंब्लीच्या बजेटरी कमिटीनें आंतरराष्ट्रीय न्यायमंडळाचा सल्ला विचारला आहे. आणखी पैशाची तांतडीनें तरतूद केली नाहीं, तर युनायटेड नेशन्सवर दिवाळखोरीची पाळी येईल, असा इशारा सेक्रेटरी जनरलनीं दिला आहे. कांहीं देश खर्चाचा आपला वांटा देण्यास तयार नाहींत. कॉंगो-संबंधीं सर्व खर्च बेल्जमनें सोसला पाहिजे, असें रशियाचें म्हणणें आहे. फ्रान्स, बेल्जम, दक्षिण आफ्रिका आणि पोर्तुगाल कॉंगो-प्रीत्यर्थ कांहींहि वांटा उचलण्यास तयार नाहींत. कांहीं देशांनीं देण्याचें मान्य केलें आहे, पण देणें थकलें आहे; तर कांहीं देश आर्थिक दुरवस्थामुळें आपण देऊं शकत नाहीं, असें सांगतात. एकटी अमेरिका कॉंगो प्रकरणांतला ४८% खर्च सोशीत आहे. भारत दरसाल ५० लक्ष रुपये नेहेमीच्या वर्गणीपेक्षा जास्त देत आहे; त्यानें आपले ५,००० सैनिकहि दिले आहेत.

### कापड स्वस्त मिळण्यासाठी उपाय

पाकिस्तान सरकारनें कापडाच्या गिरण्यांनीं कापडावर किंमतीचे शिक्के मारलेच पाहिजेत असा हुकूम काढला आहे. त्याचप्रमाणें गिरण्या ज्या घाऊक व्यापाऱ्यांना माल विकतात त्यांचीं नांवें प्रसिद्ध करण्याचें बंधनहि गिरण्यांवर घालण्यांत आलें आहे. ग्राहकांना वाजवी भावांत कापड मिळावें म्हणून हा उपक्रम करण्यांत आला आहे.

### हिंदी घोडदळासाठी पोलंडमधील घोडीं

भारत सरकारचें संरक्षण खातें लष्कराच्या घोडदळासाठी पोलंड-मधून घोडे आयात करणार आहे.

**छोट्या मोटारींचा कारखाना**—छोट्या मोटारी तयार करण्याचा कारखाना काढण्यास भारताच्या अर्थखात्याचा विरोध आहे. कारखान्यासाठी आवश्यक असणारें परदेशीय चलन मिळण्यांत अडचणी असल्यामुळें हा कारखाना सध्यांच काढण्यांत येऊं नये असें खात्याचें म्हणणें आहे. परदेशीय चलनाची टंचाई दूर झाल्यास हा कारखाना सार्वजनिक विभागांत काढण्यांत येईल.

**कटांगाच्या अध्यक्षांचें उत्पन्न**—कांगोमधून फुटून बाहेर पडू इच्छिणाऱ्या कटांगा प्रांताचे अध्यक्ष मि. शोंबे ह्यांना प्रांतांतील तांब्याच्या खाणीच्या कंपनीकडून दरसाल ५·२ कोटी डॉलर्स उत्पन्न मिळतें. त्यांना भरावे लागणारे कर आणि त्यांच्या मालकीच्या कंपनीमधील भांडवलावरील नफा ह्यांच्या रूपानें वरील उत्पन्न त्यांना मिळतें. ह्या तांब्याच्या खाणींतील भांडवलपैकी १४·४७ टक्के भांडवल ब्रिटिश मालकीचें आहे.

**अमेरिका भारताची साखर घेणार**—१९६२ सालाच्या पहिल्या सहा महिन्यांत ५०,००० टन साखर अमेरिकेला निर्यात करण्याची परवानगी अमेरिकन सरकारनें दिली आहे. साखर निर्यात करण्यासाठी तीन बोटींची व्यवस्था करण्यात आली आहे. जानेवारी महिन्याच्या मध्यापर्यंत ५० हजार टनापैकी ३१,५०० टन साखर अमेरिकेची वाट चालू लागेल. बाकीची साखर लवकर पाठविण्यासाठीं बोटी मिळविण्याची खटपट जारीनें चालू आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.